# प्रसिध्दी पत्रक

दिनांक : ०३/१०/२०२४

**महानगरपालीकेचे स्वच्छता निरीक्षक लोकसेवक अकबर खान उस्मान खान, यांनी सफाई कामगार महिलेकडुन २,०००/– रूपयांची लाच स्विकारली म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नादेंड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | विमानतळ जि.नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं ४०३/२०२४ कलम ७ भ्र.प्र.अ १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०१.१०.२०२४ चे १९.०९ वाजता स्टेडा २८ |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | अकबर खान उस्मान खान, वय ४७ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद – स्वच्छता निरीक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, क्षेत्रीय कार्यालय क्रमांक १ वर्कशॉप, नांदेड. रा. नारायण पाटील नगर, लालवाडी, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०००/– रुपये |
| लाच स्विकारली रक्कम | पहिला हप्ता २०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार ही आर अँन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका नांदेड येथे कंत्राटी सफाई कामगार आहे. यातील आरोपी लोकसेवक हा कंत्राटी सफाई कामगार यांचेवर देखरेख करण्यासाठी स्वच्छता निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.<br>तक्रारदार यांनी माहे ऑगष्ट २०२४ मध्ये पुर्ण महिनाभर सफाईचे काम केले. तक्रारदार यांना माहे ऑगस्ट/२०२४ चा पुर्ण पगार मिळाला. त्यानंतर यातील आरोपी लोकसेवक याने यातील तक्रारदार महिला सफाई कामगार यांना तुझे २५ दिवसाचे खाडे झाले आहेत. तु मला ५,०००/– रूपये दे, नाही तर मी चालु महिन्यात तुझे २५ दिवसाचे खाडे टाकतो असे म्हणून ५०००/– रूपयांची मागणी केली. सदरची रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली. त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी दिनांक ३०/०९/२०२४ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे याबाबत तक्रार दिली.<br>नमुद तक्रारीवरून ला.प्र.वि., नांदेड कडून दिनांक ०१/१०/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्यात आली. कार्यवाहीत आलोसे यांनी तक्रारदार हीस पंचासमक्ष कामाचे दिवसाचे खाडे न टाकण्यासाठी ४०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर सापळा कारवाइ दरम्यान मंगेश मेडीकल समोरील रोडवर, चौतन्य नगर, नांदेड येथे आलोसे यांनी तक्रारदार हीचेकडून लाचेची रक्कमेचा पहिला हप्ता २०००/– रुपये स्वत:चे मोटार सायकलचे पेट्रोल टाकीवरील कवरमध्ये ठेवण्याचे सांगून, लाच रक्कम स्विकारली आहे. यातील आरोपी लोकसेवकास ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन विमानतळ, जि.नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री.सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, ला.प्र.विभाग, नांदेड युनिट

Scanned with CamScanner